Shreya's

महाराष्ट्रातील एकमेव दर्जेदार प्रकाशन



गणित घटक निहाय सराव संचाच्या यशस्वीते नंतर...

# 525 उतारे (2625 प्रश्न)

# जवाहर नवोदय विद्यालय

## प्रवेश परीक्षा



इयत्ता 5 वी

मराठी व्याकरणावर आधारित प्रश्न

भाषा विषयात सर्व गुण संपादन करण्यासाठी

इ : 3 री व 4 थी साठी उपयुक्त

श्रेया महेश जगळपुरे

मयुर प्रकाशन,उदगीर

इ.5वी

जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा

SHREYA LATUR PATTERN

## श्रेया

# उतारे

## 525 उतारे - 2625 प्रश्न

## जवाहर नवोदय विद्यालय

### *प्रवेश परीक्षा*

## इयत्ता : पाचवी

श्रेया महेश जगळपुरे

मयुर प्रकाशन, उदगीर

❑ जवाहर नवोदय विद्यालय
प्रवेश परीक्षा
525 उतारे, 2625 प्रश्न

❑ प्रकाशक
मयूर पब्लिकेशन
प्लॉट क्र. 23, शिवकृपा निवास,
अप्पाराव चौक, उदगीर - 413 517
जि. लातूर, महाराष्ट्र

© मयूर पब्लिकेशन

❑ लेखिका
श्रेया महेश जगळपूरे

❑ टाईप सेटिंग
भास्कर दीनानाथराव कुलकर्णी
उदगीर - लातूर
मो. 8412825480

❑ मुखपृष्ठ :
सांची डिजीटल, उदगीर

❑ पुस्तक खरेदीसाठी संपर्क :
मयूर पब्लिकेशन
प्लॉट क्र. 23, शिवकृपा निवास,
अप्पाराव चौक, उदगीर - 413 517
जि. लातूर, महाराष्ट्र
मोबा.: 8605126047, 9834042488

# भाषाज्ञान

## 1 शब्दांच्या जाती

### (अ) नाम

**नाम :** कोणत्याही दृश्य, अदृश्य नावाला नाम म्हणतात.
उदा.: पेन, पेन्सील, बॉल, बॅट, शाळा, नदी इ.

**नामाचे प्रकार :** नामाचे तीन प्रकार पडतात.
(1) सामान्य नाम, (2) विशेषनाम, (3) भाववाचक नाम

1) **सामान्य नाम (जातीवाचक नाम) :** ज्या नामाने एकाच जातीचे प्राणी, वस्तू किंवा पदार्थ यांचा बोध होतो त्याला सामान्य नाम असे म्हणतात. याचे दोन उपप्रकार आहेत.

अ) समुदायवाचक नाम : ज्या नामातून समूहाचा बोध होतो त्याचबरोबर हे नाम समूहाला दिले गेल्यामुळे त्या नामास समुदायवाचक (समूहवाचक) नाम म्हणतात.

उदा: तांडा, परिषद, मंडळ, थवा, रास, वर्ग, कळप, गुच्छ, घोळका, संघ, संच, अरण्य, टोळी, डझन, रास इ.

ब) पदार्थवाचक नाम : कोणत्याही पदार्थाला दिलेल्या नावास पदार्थवाचक नाम म्हणतात.उदा.: दूध, दही, कापड, सोने, चांदी, साखर, मीठ, लोखंड, इ.
समुदायवाचक नाम व पदार्थवाचक नाम यांचा समावेश सामान्य नामातच केला जातो.

2) **विशेष नाम (व्यक्तीवाचक नाम):** ज्या नामावरून विशिष्ट जातींचा (व्यक्ती, प्राणी, वस्तू) याचा बोध होतो त्यास विशेषनाम म्हणतात.

उदा.: रवी, कृष्णा, कावेरी, मीना, भारत, महाराष्ट्र इ.
नदी हे सामान्य नाम आहे कारण कोणत्याही नदीला आपण नदी म्हणू शकतो पण गोदावरी हे विशेष नाम आहे कारण गोदावरी नदीलाच आपण गोदावरी म्हणू शकतो.

✦ खाली काही सामान्य नाम व विशेषनामे दिलेली आहे.

| सामान्य नाम | विशेषनामे |
|---|---|
| मुलगा | अजय, विश्वास, रवी, अमेय, अभय, किशोर, राजीव, शशी, संजय, कृष्ण, महेश |
| मुलगी | मीना, मीरा, कविता, सुनिता, लता, गीता, मधुरा, रंजना, संजना, कुमुद, सुप्रिया |
| देश | भारत, नेपाळ, श्रीलंका, अमेरिका, इंग्लंड, बांग्लादेश, इंग्लंड, चीन, ऑस्ट्रिया |
| खंड | आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, युरोप |
| सागर | हिंद महासागर, पॅसिफिक महासागर, आर्क्टिक महासागर |
| ग्रह | पृथ्वी, मंगळ, शुक्र, गुरू, प्लुटो, बुध |
| राज्य | महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगाणा, गोवा |
| शहर | लातूर, परभणी, ठाणे, रायगड, पुणे, हिंगोली |
| पर्वत | सह्याद्री, बालाघाट, हिमालय, निलगिरी |
| नदी | गंगा, गोदावरी, नर्मदा, सिंधू, कावेरी, नाईल |
| जिल्हा | लातूर, पुणे, हिंगोली, नागपूर, वर्धा, नाशिक |

3) **भाववाचक नाम :** ज्या नामाने प्राणी, वस्तू यांच्यामध्ये असलेल्या गुण, धर्म किंवा भाव यांचा बोध होतो तेंव्हा त्यास भाववाचक नाम किंवा धर्मवाचक नाम म्हणतात.

उदा.: वृद्धत्व, बंधुत्व, औदार्य, दैन्य, शहाणपण, भोळेपणा, स्वतंत्रता, भिन्नता, वीरता, समता, सुंदरता इ.

नोट : भाववाचक नामावरून गुणांचा किंवा धर्माचा बोध

होतो. भाववाचक नामे हे नेहमी एकवचनीच राहतात. त्यांचे अनेकवचन होत नाही.

❑ भाववाचक नामे तयार करण्याच्या पद्धती : सामान्यनामे व विशेषणे यांना य, त्व, पण, पणा, ता, गिरी, वा, की, ई, आई यासारखे प्रत्यय लावून भाववाचक नामे तयार केली जातात.

| क्र. | शब्द | प्रत्यय | भाववाचक नाम | इतर उदाहरणे |
|---|---|---|---|---|
| 1. | चतुर | य | चातुर्य | पांडित्य, मांगल्य, दैन्य, शौर्य, माधुर्य, धैर्य, गांभीर्य, औदार्य, नाविन्य, क्रौर्य, वैफल्य, सौंदर्य, वात्सल्य, शैथिल्य |
| 2. | कवि | त्व | कवित्व | प्रौढत्व, मित्रत्व, शत्रूत्व, नेतृत्व, बंधूत्व, वक्तृत्व, गुरूत्व, मनुष्यत्व, मातृत्व, चतुरत्व |
| 3. | देव | पण | देवपण | खारटपण, म्हातारपण, मोठेपण, बालपण, लहानपण, सोयरपण, गोरेपण, प्रेमळपण, थोरपण, प्रामाणिकपण |
| 4. | भोळा | पणा | भोळेपणा | प्रेमळपणा, नम्रपणा, दुष्टपणा, शहाणपणा, आंधळेपणा, मोठेपणा, भित्रेपणा, मूर्खपणा, चांगलुपणा, प्रामाणिकपणा |
| 5. | शांत | ता | शांतता | नम्रता, सुंदरता, शुभ्रता, समता, व्यावसायिकता, क्रूरता, भिन्नता, सामाजिकता, विषमता, विषण्णता, वीरता, एकता, वक्रता |
| 6. | दूर | वा | दुरावा | गारवा, ओलावा, थकवा, पुरावा, गोडवा, विसावा, थंडावा, सुगावा |
| 7. | हेर | गिरी | हेरगिरी | गांधीगिरी, दादागिरी, वस्तादगिरी, मुलूखगिरी, लुच्चेगिरी, फसवेगिरी, सावधगिरी, गुलामगिरी, गुंडगिरी, शिपाईगिरी, कारागिरी, भामटेगिरी |
| 8. | लोहार | की | लोहारकी | गावकी, बहादूरकी, फुशारकी, सोनारकी, सुतारकी, माणुसकी, आपुलकी, उनाडकी, मास्तरकी, सावकारकी, भावकी |
| 9. | वकील | ई | वकिली | गोडी, नोकरी, शांती, चोरी, हमाली, मालकी, लायकी, हुशारी, लबाडी, मैत्री, श्रीमंती |
| 10. | दांड | गाई | दांडगाई | कठिणाई, नवलाई, खोदाई, धुलाई, चतुराई, चपळाई |

## (ब) सर्वनाम

❑ **सर्वनाम :** नामाऐवजी वापरल्या जाणाऱ्या शब्दाला सर्वनाम असे म्हणतात. वाक्यातील नामाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्वनाम वापरतात.

✦ मराठीत एकूण नऊ सर्वनामे आहेत.
1) मी 2) तू 3) तो 4) हा 5) जो 6) कोण 7) काय 8)आपण 9) स्वत:

✦ सर्वनामाचे मुख्य सहा प्रकार पडतात.

1) पुरुषवाचक सर्वनामे
2) दर्शक सर्वनामे
3) संबंधी सर्वनामे
4) प्रश्नार्थक सर्वनामे
5) सामान्य/अनिश्चित सर्वनामे
6) आत्मवाचक सर्वनामे

✦ सर्वनामाची काही उदाहरणे :

01) **मी** लिहित आहे.
02) **आम्ही** लवकर शाळेत गेलो.
03) **आपण** यात्रेला जाऊ.
04) **स्वत:** नोट्स तयार करून घेतो.
05) **आम्ही** सामना जिंकलो.
06) **तू** एवढे पाठांतर कर.
07) **तुम्ही** सावकाश जा.
08) **ती** शाळेत जाते.
09) **त्या** वेगाने धावतात.
10) **ते** गीत गातात.
11) **तो** अभ्यास करतो.
12) **ही** माझी बहिण आहे.
13) **हे** माझे पुस्तक आहे.
14) **हा** प्रामाणिक आहे.
15) **ह्या** गीत गातात.
16) **ती** चुणचुणीत मुलगी आहे.
17) **जो** चुकतो तोच शिकतो.
18) **जे** दिसते ते नसते.
19) **ज्याला** मी काल पाहिले तोच हा.
20) **जिच्या** हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी.
21) **जिला** उशीर होईल तिला वर्गात घेतले जाणार नाही.
22) **ज्यांना** एक वेळेचे जेवण मिळत नाही त्याला मदत करावी.
23) **ज्यांनी** जे कर्म केले तसे फळ मिळते.
24) **कोणी** कोणाला बोलू नये.
25) **काय** त्याचे काम?
26) **कोणीही** यावे **कोणीही** जावे.
27) **कोणालाही** आता बाहेर जाता येणार नाही.
28) **आपण** आलो तर बरे होईल.
29) **आपणहून** तो माझ्याकडे आला.

वरील सर्व वाक्यांमध्ये गडद व अधोरेखित केलेले शब्द सर्वनामे आहेत.

## (क) विशेषण

❑ **विशेषण :** नामाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दाला विशेषण असे म्हणतात.

| विशेषण | विशेष्य | विशेषण | विशेष्य |
|---|---|---|---|
| चांगली | माणसे | पांढरी | गाय |
| गरम | पाणी | हिरवे | रान |
| क्रूर | जनावर | दहा | पेना |
| मोडकी | टोपली | हिरवी | भाजी |
| लाल | गाय | काळी | बकरी |
| मधूर | आवाज | नवे | पुस्तक |

✦ **विशेषणाचे प्रकार :**

विशेषणाचे मुख्य तीन प्रकार पडतात.

(1) गुणविशेषण, (2) संख्याविशेषण,
(3) सार्वनामिक विशेषण

1) **गुणविशेषण :** नामाच्या कोणत्याही प्रकारचा गुण किंवा विशेष दाखविणाऱ्या विशेषणास गुण विशेषण असे म्हणतात.

उदा.: उंच, सखल, गोड, लख्ख, बिकट, भव्य, पांढरे, शुभ्र, शूर, श्रीमंत, गरीब, मधूर, सुंदर, लहान, प्रेमळ, ताजे, पिवळे, उंच, काळी, म्हातारी, कडू, विद्वान, कनिष्ट, आनंदी, थोरला, धूर्त, आंबट इत्यादी

2) **संख्याविशेषण :** ज्या विशेषणांचा उपयोग केवळ गणती किंवा गणना करण्यासाठी केला जातो, त्याला गणनावाचक संख्याविशेषण म्हणतात.

उदा.: पाच, सात, शंभर, हजार, लक्ष, पंच, अष्ट, अर्धा, पाव, पाऊण, पाच सप्तमांश, अर्धाकिलो, पावलीटर, दोन्ही, पाची, दाही, चारी, सहाही, पहिला, चौथा, सातवा, पंधरावे, तेरावी, दुसरा, पन्नासावे, चौपट, नऊवारी, शतशः, चौपदरी, त्रिवार, त्रिगुणित, दुहेरी, शतगुणित, एकेक, दोन-दोन, पाच-पाच, सात-सात, थोडी, सर्व काही, खूप, इतर, सकल, पुष्कळ, बहू, कित्येक, अल्प, बरीच, एकंदर, भरपूर, सगळे

3) **सार्वनामिक विशेषण :** जी सर्वनामे नामाबद्दल विशेष माहिती सांगण्याचे कार्य करतात तेव्हा त्यांना सार्वनामिक विशेषणे म्हणतात.

उदा.: **माझे** घर. **हा** मुलगा.
**कोणते** गाव? **असल्या** गोष्टी.
**तुमची** शाळा. **ही** गाडी.
**त्याची** बॅग.

सर्वनाम हे नामाच्या ऐवजी येते त्यामुळे ते नामाच्या पूर्वी केव्हाही येत नाही. परंतु ते जेव्हा नामाच्या पुर्वी येते तेव्हा ते सर्वनाम न राहता सार्वनामिक विशेषण होते.

| सर्वनाम | सार्वनामिक विशेषण |
|---|---|
| **हा** शहाणा मुलगा आहे. | **हा** मुलगा शहाणा आहे. |
| **तो** सुंदर मोर आहे. | **तो** मोर सुंदर आहे. |
| **जो** अभ्यास करतो तो हुशार होतो. | **जो** मुलगा अभ्यास करतो तो हुशार होतो. |
| **कोण** येऊन गेला? | **कोण** मुलगा येऊन गेला? |
| **ही** चुणचुणीत मुलगी आहे. | **ही** मुलगी चुणचुणीत आहे. |
| **त्याने** काय आणले? | **त्याने** काय वस्तू आणल्या? |
| **आम्हाला** कोण विचारतो? | **आम्हा** मुलांना कोण विचारतो? |

## (ड) क्रियापद

❑ **क्रियापद :** वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या क्रियावाचक शब्दाला क्रियापद असे म्हणतात.

उदा.: 1) गाय दूध **देते**.
2) मुली खो-खो **खेळतात**.
3) ती गाणे **गाते**.
4) नेहमी खरे **बोलावे**.
5) ते परमेश्वराची प्रार्थना **करतात**.

✦ आणखी काही उदाहरणे :

1) तू नियमित पुस्तक **वाचत जा**.
2) मुली मैदानावर **खेळू लागली**.
3) त्याचे जेवण **राहिले आहे**.
4) त्याची गोष्ट **लिहून झाली**.
5) तो **चालत होता**.
6) मुलाने खेळणे **तोडून टाकले**.
7) तो सारखा **हसू लागला**.
8) मुले गाणी **म्हणू लागले**.
9) शेतात गुरे **चरत होती**.
10) माकड झाडावर **चढत होते**.
11) महिला पाणी **भरत होत्या**.
12) मुले अभ्यास **करत आहेत**.
13) मी रात्री वाचन **करणार आहे**.
14) मुले शाळेला **जात आहेत**.
15) शेतकरी शेतात काम **करत आहेत**.
16) गुरुजी वर्गात **शिकवत आहेत**.
17) मुले मैदानावर **खेळत आहेत**.
18) आई स्वयंपाक **करत आहे**.

वरील वाक्यात एक क्रियापद व एक सहाय्यक क्रियापद आले आहे.

✦ **सोडवा.**

**01)** मुंबई हे उत्तम बंदर आहे. या वाक्यात नामांची संख्या किती आहे?
A) एक  B) दोन  C) तीन  D) चार

**02)** सकाळी शाळेच्या प्रांगणात मुलांनी व्यायाम केला. या वाक्यात नामांची संख्या किती आहे?
A) चार  B) सहा  C) तीन  D) पाच

**03)** हिरवीगार शेते वाऱ्याच्या झुळकीने डोलत होती. या वाक्यात असणारे विशेषण कोणते?
A) शेते  B) हिरवीगार  C) वाऱ्यावर  D) झुळकीने

**04)** मी काल बाजारात फळे विकत घेतली. या वाक्यात सर्वनाम कोणते आहे?
A) मी  B) काल  C) फळे  D) घेतली

**05)** मी काल वाचनालयातील नवीन पुस्तक घेतले. या वाक्यात विशेषण कोणते आले आहे?
A) मी  B) नवीन  C) पुस्तक  D) घेतले

**06)** रामाने नदीवर मजबूत पूल बांधला. या वाक्यात नामांची संख्या किती आहे?
A) एक  B) चार  C) दोन  D) तीन

**07)** त्या गावात मोठा बाजार भरतो. या वाक्यात विशेषण कोणते आहे?
A) बाजार  B) मोठा  C) गावात  D) त्या

**08)** आम्ही मित्रांसोबत सहलीला गेलो. या वाक्यातील क्रियापद कोणते?
A) गेलो  B) सहलीला  C) आम्ही  D) मित्र

**09)** समुद्रकिनाऱ्यावर थंड वारा वाहत होता. या वाक्यात विशेषणाची संख्या किती आहे?
A) एक  B) दोन  C) तीन  D) चार

**10)** सुट्टीत आम्ही नातेवाईकांना भेटलो. या वाक्यात सर्वनाम कोणते आहे?
A) सुट्टी  B) नातेवाईक  C) आम्ही  D) भेटलो

**11)** हिरव्या गवतावर पांढरे कबुतर चालत आहे. या वाक्यात विशेषण कोणते आहे?
A) हिरवे, गवत  B) पांढरे, चालत  C) हिरव्या, पांढरे  D) गवत, आहे

**12)** रत्यावर पिवळ्या फुलांची रांग होती. या वाक्यात नामांची संख्या किती आहे?
A) दोन  B) चार  C) तीन  D) पाच

**13)** चंद्रप्रकाशात समुद्र चमकत होता. या वाक्यात विशेषण कोणते आहे?
A) चंद्रप्रकाशात  B) समुद्र  C) चमकत  D) होता

**14)** वाघ जंगलात शांत बसला होता. या वाक्यात नामांची संख्या किती आहे?
A) एक  B) दोन  C) तीन  D) चार

**15)** आम्ही शाळेच्या कार्यक्रमात भाग घेतला. या वाक्यात क्रियापद कोणते आहे?
A) आम्ही  B) शाळेच्या  C) भाग  D) घेतला

16) मोठ्या खोलीत सुंदर चित्रे लावली होती. या वाक्यात विशेषणांची संख्या किती आहे?
A) तीन B) दोन C) एक D) चार

17) रामाने बागेत झाडांना पाणी घातले. या वाक्यात नामांची संख्या किती आहे?
A) एक B) तीन C) दोन D) चार

18) सकाळच्या उन्हात सोनेरी शेते चमकत होती. या वाक्यात विशेषणांची संख्या किती आहे?
A) तीन B) दोन C) एक D) चार

19) नद्या डोंगरातून वाहत खाली येतात. या वाक्यात नामांची संख्या किती आहे?
A) एक B) तीन C) दोन D) चार

20) देशभक्ती आणि त्याग या गुणांनी राष्ट्राची प्रगती होते. या वाक्यात भाववाचक नाम कोणते?
A) त्याग B) गुणांनी C) प्रगती D) राष्ट्राची

21) ज्ञान आणि प्रामाणिकपणा यामुळे जीवनात यश मिळते. या वाक्यात भाववाचक नामांची संख्या किती आहे?
A) दोन B) तीन C) चार D) एक

22) शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना रोज नवीन गोष्टी शिकवतात. या वाक्यात सामान्य नामांची संख्या किती आहे?
A) दोन B) चार C) तीन D) एक

23) सत्य आणि अहिंसा या तत्त्वांनी समाजात शांतता निर्माण होते. या वाक्यात भाववाचक नामांची संख्या किती आहे?
A) एक B) चार C) दोन D) तीन

24) मैत्री आणि विश्वास या नात्यामुळे जीवन सुंदर होते. या वाक्यात भाववाचक नामाची संख्या किती?
A) एक B) तीन C) दोन D) चार

25) आनंद, समाधान आणि प्रेरणा यामुळे प्रयत्नांना बळ मिळते. या वाक्यात भाववाचक नाम कोणते नाही?
A) आनंद B) यामुळे C) प्रेरणा D) समाधान

26) गावातील बाजारात लोकांनी भाजीपाला विकत घेतला. या वाक्यात नाम कोणते नाही?
A) विकत B) गाव C) लोक D) भाजीपाला

27) शेतकरी शेतात नांगर घेऊन पिके पिकवत होता. या वाक्यात नामांची संख्या किती आहे?
A) पाच B) चार C) तीन D) दोन

28) सुंदर बागेत रंगीबेरंगी फुले उमलली होती. या वाक्यात विशेषणांची संख्या किती आहे?
A) एक B) दोन C) तीन D) चार

29) मेहनती शेतकरी हिरव्यागार शेतात काम करत होता. या वाक्यात कोणते विशेषण आले आहे?
A) मेहनती, शेतकरी B) हिरव्यागार, शेतात
C) मेहनती, हिरव्यागार D) मेहनती, करत

30) थंड वाऱ्यावर स्वच्छ आभार निळसर दिसत होते. या वाक्यात विशेषण कोणते आले नाही?
A) आकाश B) थंड C) स्वच्छ D) निळसर

**31)** प्रसिद्ध लेखकाने रोचक कथा लिहिली. या वाक्यात विशेषण किती?
A) तीन B) दोन C) चार D) एक

**32)** स्वातंत्र्य सैनिकानी देशासाठी बलीदान दिले. या वाक्यातील भाववाचक नाम कोणते?
A) स्वातंत्र्यसैनिकानी B) बलीदान C) देश D) दिले

**33)** सावित्रीबाई फुले या पहिल्या महिला शिक्षिका होत्या. या वाक्यातील विशेषनाम कोणते?
A) पहिल्या B) महिला C) सावित्रीबाई फुले D) शिक्षिका

**34)** आपल्या गावातील शाळेत अनेक मुले शिकत आहेत. या वाक्यात किती सामान्य नाम आले आहेत?
A) एक B) तीन C) दोन D) चार

**35)** विजयने आपल्या मित्राला आनंदाची बातमी सांगितली. या वाक्यात सामान्य नाम व भाववाचक नाम अनुक्रमे कोणती आले आहेत?
A) आनंद, बातमी B) विजय, आनंद C) बातमी, आनंद D) मित्र, विजय

**36)** माणसाचे आयुष्य प्रामाणिकपणा आणि परिश्रमावर अवलंबून असते. या वाक्यात कोणती दोन भाववाचक नामे आली आहेत?
A) प्रामाणिकपणा, माणुसाचे B) परिश्रम, माणसाचे
C) आयुष्य, परिश्रम D) प्रामाणिकपणा, परिश्रम

**37)** लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यासाठी नि:स्वार्थ सेवा केली. या वाक्यात कोणते विशेषनाम आले आहे?
A) स्वातंत्र्यासाठी B) नि:स्वार्थ C) लोकमान्य टिळक D) सेवा

**38)** भारत देशाची ऐक्य आणि बंधुता ही त्याची खरी ताकद आहे. या वाक्यात भाववाचक नामांची संख्या दोन आहे. ती कोणती आहेत?
A) भारत, देश B) ऐक्य, खरी C) ऐक्य, बंधुता D) ताकद, बंधुता

**39)** ताजमहाल ही भारतातील प्रसिद्ध ऐतिहासिक स्मारक आहे. या वाक्यात विशेषनामांची संख्या किती आहे व ती कोणती?
A) 1; ताजमहाल B) 2; भारत, ताजमहाल
C) 3; ताजमहाल, भारत, प्रसिद्ध D) 2; स्मारक, भारत

**40)** उद्यानात पक्षी गोड गाणी गात होते. या वाक्यात किती सामान्य नाम आहेत व कोणती आहेत?
A) 2; उद्यान, गाणी B) 3; उद्यान, गाणी, होते
C) 3; उद्यान, गात, होते D) 3; उद्यान, पक्षी, गाणी

## उत्तरसूची : शब्दाच्या जाती

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 01) Ⓐ ● Ⓒ Ⓓ | 02) Ⓐ Ⓑ Ⓒ ● | 03) Ⓐ ● Ⓒ Ⓓ | 04) ● Ⓑ Ⓒ Ⓓ | 05) Ⓐ ● Ⓒ Ⓓ |
| 06) Ⓐ Ⓑ Ⓒ ● | 07) Ⓐ ● Ⓒ Ⓓ | 08) ● Ⓑ Ⓒ Ⓓ | 09) ● Ⓑ Ⓒ Ⓓ | 10) Ⓐ Ⓑ ● Ⓓ |
| 11) Ⓐ Ⓑ ● Ⓓ | 12) Ⓐ Ⓑ ● Ⓓ | 13) ● Ⓑ Ⓒ Ⓓ | 14) Ⓐ ● Ⓒ Ⓓ | 15) Ⓐ Ⓑ Ⓒ ● |
| 16) Ⓐ ● Ⓒ Ⓓ | 17) Ⓐ Ⓑ Ⓒ ● | 18) Ⓐ ● Ⓒ Ⓓ | 19) Ⓐ Ⓑ ● Ⓓ | 20) ● Ⓑ Ⓒ Ⓓ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 21) Ⓐ ● Ⓒ Ⓓ | 22) Ⓐ Ⓑ ● Ⓓ | 23) Ⓐ Ⓑ Ⓒ ● | 24) Ⓐ Ⓑ ● Ⓓ | 25) Ⓐ ● Ⓒ Ⓓ |
| 26) ● Ⓑ Ⓒ Ⓓ | 27) Ⓐ ● Ⓒ Ⓓ | 28) Ⓐ ● Ⓒ Ⓓ | 29) Ⓐ Ⓑ ● Ⓓ | 30) ● Ⓑ Ⓒ Ⓓ |
| 31) Ⓐ ● Ⓒ Ⓓ | 32) Ⓐ ● Ⓒ Ⓓ | 33) Ⓐ Ⓑ ● Ⓓ | 34) Ⓐ ● Ⓒ Ⓓ | 35) Ⓐ Ⓑ ● Ⓓ |
| 36) Ⓐ Ⓑ Ⓒ ● | 37) Ⓐ Ⓑ ● Ⓓ | 38) Ⓐ Ⓑ ● Ⓓ | 39) Ⓐ ● Ⓒ Ⓓ | 40) Ⓐ Ⓑ Ⓒ ● |

## स्पष्टीकरणासह उत्तरे : शब्दाच्या जाती

01) या वाक्यामध्ये मुंबई आणि बंदर हे दोन नाम आहेत.

02) सकाळ, शाळा, प्रांगण, मुले, व्यायाम ही पाच नामे आहेत.

03) या वाक्यात हिरवीगार हे विशेषण आहे.

04) या वाक्यात मी हे एकच सर्वनाम आहे.

05) या वाक्यात पुस्तकाबद्दल विशेष माहिती सांगणारा शब्द नवीन आहे म्हणजे हे विशेषण आहे.

06) या वाक्यात राम, नदी, पुल हे तीन नाम आहेत.

07) या वाक्यात मोठा हे विशेषण आहे.

08) क्रिया दर्शविणारा शब्द गेलो हा आहे म्हणून ते क्रियापद आहे.

09) या वाक्यात वारा या नामाबद्दल विशेष माहिती सांगणारा शब्द थंड आहे म्हणून थंड हे एक विशेषण आहे.

10) नामाऐवजी येणारा शब्द आम्ही आहे म्हणून आम्ही हे सर्वनाम आहे.

11) हिरव्या आणि पांढरे हे दोन विशेषण आहेत.

12) रस्ता, फुले, रांगा हे तीन नाम या वाक्यात आलेली आहेत.

13) समुद्र कुठल्या प्रकाशात चमकत आहे ते सांगणारा शब्द चंद्रप्रकाश हा आहे म्हणून चंद्रप्रकाश हे विशेषण आहे.

14) या वाक्यात वाघ आणि जंगल ही दोन नामे आहेत.

15) घेतला हे क्रियापद आहे.

16) मोठ्या आणि सुंदर ही दोन विशेषणे आहेत.

17) राम, बाग, झाडे, पाणी ही नामे आहेत.

18) सकाळच्या, सोनेरी ही दोन विशेषणे आहेत.

19) नद्या आणि डोंगर ही दोन नामे आहेत.

20) या वाक्यात देशभक्ती आणि त्याग हे दोन भाववाचक नामे आहेत.

21) ज्ञान, प्रामाणिकपणा, यश ही नामे भावना/गुण दर्शवितात म्हणून ही भाववाचक नामे आहेत.

22) या वाक्यात शाळा, शिक्षक, विद्यार्थी हे तीन सामान्य नाम आहेत.

23) या वाक्यामध्ये सत्य (गुण), अहिंसा (वृत्ती), शांतता (अवस्था) ही तीन भाववाचक नामे आहेत.

24) या वाक्यामध्ये मैत्री (भावना), विश्वास (गुण) ही दोन भाववाचक नामे आहेत.

25) या वाक्यात पर्यायापैकी (पर्याय B) यामुळे) हे भाववाचक नाम नाही. इतर पर्याय - आनंद, समाधान आणि प्रेरणा ही तीन भाववाचक नामे आहेत.

26) या वाक्यात दिलेल्या पर्यायांपैकी गाव, बाजार, भाजीपाला ही नामे असून विकत हे नाम नाही. तसेच या वाक्यात लोक हे सुद्धा नाम आहे.

27) या वाक्यात शेतकरी, शेत, नांगर, पिके ही चार सामान्य नामे आहेत.

28) या वाक्यात सुंदर आणि रंगीबेरंगी ही विशेषणे आहेत.

29) या वाक्यामध्ये मेहनती आणि हिरव्यागार ही दोन विशेषणे आहेत.

30) या वाक्यामध्ये थंड, स्वच्छ, निळसर ही विशेषणे आली आहेत.

31) प्रसिद्ध आणि रोचक ही दोन विशेषणे आहेत.

04) छपाई यंत्रामुळे कोणती गोष्ट शक्य झाली?

A) हस्तलिखितांचे प्रमाण वाढले
B) माहिती फक्त धर्मगुरूंना मिळाली
C) ग्रंथ मोठ्या प्रमाणात तयार झाले
D) ग्रंथ खूप महाग झाले

05) आज छपाई यंत्राचे स्थान कोणत्या तंत्रज्ञानाने घेतले आहे?

A) दूरदर्शन B) डिजिटल माध्यमे C) हस्तलिखित D) कम्प्युटर प्रिंटर

## उतारा - 99

भारत माझा देश आहे या विधानामागे केवळ नागरिकत्व नाही, तर एक जबाबदारी आणि आत्मिक नातं आहे, असं यदुनाथ थत्ते मानत. त्यांच्या मते, भारत हा केवळ भूप्रदेश नाही, तर एक संस्कृती, परंपरा, आणि विचारधारा आहे. त्यांनी देशभक्तीला आंधळं प्रेम न मानता, सजगतेची आणि प्रश्न विचारण्याची वृत्ती मानली. थत्ते म्हणतात, देशावर प्रेम करणं म्हणजे त्याच्या चुकांवर डोळेझाक करणं नव्हे, तर त्याच्या उणिवा समजून त्याचं परिवर्तन साधणं हेच खरे देशप्रेम. त्यांनी भारतीय लोकशाहीवर प्रचंड विश्वास ठेवला आणि समाजातील सर्व घटकांनी सहभाग घ्यावा, ही त्यांची धारणा होती. भारतीय तरुणांनी आपल्या देशाचे प्रश्न समजून घेऊन, तटस्थ आणि विवेकबुद्धीने विचार करणं गरजेचं आहे, असं त्यांचं मत होतं. त्यांना वाटत होतं की, भारताचा खरा विकास केवळ तांत्रिक प्रगतीत नव्हे, तर सामाजिक समतेत आणि नैतिक मूल्यांच्या अंमलात आहे. भारत हा एक प्रयोग आहे, आणि प्रत्येक पिढीला तो पुन्हा नव्याने घडवावा लागतो, हा त्यांचा मूलभूत विचार होता.

01) यदुनाथ थत्ते यांच्या मते भारत म्हणजे काय?

A) फक्त जमीन
B) राजकीय सत्ता
C) एक संस्कृती आणि विचारधारा
D) एक ऐतिहासिक वस्तू

02) यदुनाथ थत्ते यांच्यानुसार खरे देशप्रेम कशात आहे?

A) देशाचे कौतुक करण्यात
B) आंधळं समर्थन करण्यात
C) उणिवा दडवण्यात
D) चुकांमध्ये सुधारणा करण्यात

03) त्यांच्या विचारांनुसार भारतीय तरुणांनी कोणत्या दृष्टिकोनातून विचार करावा?

A) राजकीय दृष्टिकोनातून
B) अंधश्रद्धेच्या आधारे
C) तटस्थ आणि विवेकबुद्धीने
D) इतिहासाच्या आधारावर

04) विश्वास या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द निवडा.

A) श्रद्धा B) संशय C) आत्मा D) समता

05) यदुनाथ थत्ते यांच्यानुसार भारताचा खरा विकास कोणत्या गोष्टीत आहे?

A) शस्त्रसज्जतेत
B) तांत्रिक प्रगतीत
C) सामाजिक समता आणि नैतिक मूल्यांमध्ये
D) ऐतिहासिक वारशामध्ये

## उतारा - 100

फुलपाखरांचं आयुष्य क्षणभंगुर असलं तरी त्यात विलक्षण सौंदर्य, चैतन्य आणि नजाकत आहे. वि. पां. दांडेकर यांनी फुलपाखरांच्या माध्यमातून निसर्गातील सूक्ष्म हालचाली, जीवनाचा गूढ अर्थ आणि क्षणाचं महत्त्व सांगितलं आहे. फुलपाखरं कुठल्याही बंधनात राहत नाहीत. त्यांना ना घर असतं ना परिघ. तरीसुद्धा ती प्रत्येक फुलावर थांबून आपलं

कार्य करत असतात - परागसिंचनाचं. एक पांढरं, नाजूक पंखांचं फुलपाखरू कधी गुलाबावर, कधी जास्वंदावर तर कधी जंगलाच्या कुठल्याशा झुडपावर उतरून सौंदर्य पेरून जातं. त्यांचं आयुष्य सांगतं - क्षणाचा आनंद घ्या, कारण तोच खरा शाश्वत आहे. दांडेकरांच्या लेखणीतून फुलपाखरं जणू बोलायला लागतात. त्या रंगीबेरंगी पंखांमागे एक जीवनदृष्टी आहे - झाड झाडालाच ओळखतं, ही जुन्या जगाची प्रगल्भ म्हण त्यांच्या निवेदनात उमटते. निसर्गातील अशा साध्याभोळ्या जीवांकडे पाहण्याची नजर विकसित केली, तर आपल्यालाही जीवनातील सौंदर्य जाणवू लागेल. फुलपाखरांच्या मुक्त उडणीतून माणसानेही आपल्या इच्छांचं ओझं बाजूला ठेवून मोकळं जगायला शिकावं, हाच खरा संदेश या लेखातून मिळतो.

01) लेखकाच्या मते फुलपाखरांचे आयुष्य आपल्याला कोणता संदेश देते?
A) शाश्वततेचा B) संकुचिततेचा C) क्षणिकतेचा D) यशस्वी जीवनाचा

02) फुलपाखरांमध्ये कोणते गुण दिसतात, जे लेखकाने विशेष अधोरेखित केले आहेत?
A) धैर्य आणि ताकद B) चपळता आणि राग
C) सौंदर्य, चैतन्य आणि नजाकत D) कठोरता आणि आवेश

03) झाड झाडालाच ओळखतं - या म्हणीचा अन्वयार्थ काय लावता येईल?
A) झाडे एकमेकांवर विसंबून असतात B) निसर्गच निसर्ग समजू शकतो
C) झाडे सर्वांना सावली देतात D) जंगलातील जीव शांत असतात

04) क्षणाचा आनंद घ्या, कारण तोच खरा शाश्वत आहे - या वाक्यातील संदेश कोणत्या मूल्याशी संबंधित आहे?
A) ऐहिक सुख B) अध्यात्म C) क्षणाचं महत्त्व D) सामाजिक न्याय

05) नजाकत या शब्दाचा योग्य समानार्थी शब्द कोणता?
A) कोमलता B) कडकपणा C) थेटपणा D) कठोरता

## उतारा - 101

कोकण म्हणजे निसर्गाची शुद्ध कविता. पश्चिम घाटांच्या कुशीत विसावलेला हा प्रदेश, जणू पृथ्वीवरील स्वर्ग आहे. सकाळी मोकळ्या आकाशाखाली वाफाळलेली शेती, हिरव्या वनराईतून झिरपणारे सुर्यप्रकाशाचे सोनेरी तुकडे, आणि समुद्राच्या लाटांनी वाऱ्यासोबत छेडलेले सूर - हे दृश्य अंत:करणात घर करून बसते. नारळ-पोफळींची डोलणारी झाडं, आंब्याचे डवरलेले बागायत, आणि ओहोटीच्या वेळेस उघडणारे खाड्यांचे गूढ रूप यामध्ये कोकणाची रांगोळी उलगडते. येथे फुलणाऱ्या मोगऱ्याचा सुगंध आणि कोळ्यांच्या होड्यांतून येणारा खडखडाट, हे सारे निसर्गाच्या लयीत मिसळलेले असते. येथील जीवन साधं, सरळ आणि श्रमप्रधान आहे. लोक प्रेमळ असले तरी संयमीही आहेत. इथे गाव जागा झाला की वारा सुटतो असा अनुभव वारंवार येतो - म्हणजे एकदा गडबड सुरू झाली की सगळे जण तिच्यात ओढले जातात. कोकणातील सौंदर्य केवळ डोळ्यांनी पाहण्याचं नसून हृदयाने अनुभवण्याचं आहे. कोकण म्हणजे निसर्गाचा मुक्त आविष्कार - शांततेचा, रंगांचा आणि सजीवतेचा संगम. इथे प्रत्येक क्षण सांगतो, हेच खरं जीवन आहे.

01) लेखकाने कोकणाच्या सौंदर्याची तुलना कोणाशी केली आहे?
A) शहराच्या गजबजाटाशी B) शाळेतील मैदानाशी C) पृथ्वीवरील स्वर्गाशी D) वाळवंटाशी

02) गाव जागा झाला की वारा सुटतो या वाक्प्रचाराचा अर्थ काय लावता येईल?
A) गाव झोपलेला असतो B) वाऱ्याचा वेग कमी असतो
C) गडबड सुरू झाली की सर्वजण त्यात सामील होतात D) वाऱ्यामुळे पाऊस येतो

03) लेखकाच्या मते कोकणातील निसर्ग कसा असतो?
A) नीरस आणि कंटाळवाणा B) धोकादायक आणि कोरडा
C) रंगीबेरंगी आणि सजीव D) कृत्रिम आणि थंड

04) सुगंध या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?
A) वास B) आवाज C) प्रकाश D) स्पर्श

05) लेखकाच्या दृष्टीने कोकणातील सौंदर्य अनुभवण्यासाठी काय आवश्यक आहे?
A) दूरदर्शन B) फक्त डोळे C) हृदय आणि भावना D) मोबाईल कॅमेरा

## उतारा - 102

वालचंद हिराचंद हे भारतीय उद्योगविश्वातील एक द्रष्टे, धैर्यवान आणि दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्त्व होते. ब्रिटिश सत्तेखाली भारत असताना त्यांनी भारतीयांना आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखवला. त्यांनी लढाई न केल्यासारखं शांतपणे पण जिद्दीने भारतात विविध क्षेत्रांत उद्योग सुरू केले. स्वदेशी उद्योगांची सुरुवात ही खरी स्वातंत्र्याची बीजे आहेत, हा त्यांचा मूलमंत्र होता. त्यांनी जलवाहतूक, विमा, साखर उद्योग आणि मुख्यतः हिंदुस्तान एरोनॉटिक्स या क्षेत्रात मोलाचे कार्य केले. वालचंद यांनी जेव्हा विमाननिर्मितीचा कारखाना सुरू केला, तेव्हा अनेकांना ते अशक्य वाटले. पण त्यांच्या जिथे इच्छा, तिथे मार्ग या वृत्तीने तो शक्य केला. त्यांचा दृष्टिकोन केवळ आर्थिक नव्हता, तर सामाजिकही होता. त्यांनी कामगार कल्याणासाठी अनेक योजना राबवल्या. आपल्या कार्यातून त्यांनी दाखवून दिलं की दृष्टी असूनही अंध असणं हे आळशी मनाचं लक्षण आहे.

01) वालचंद हिराचंद यांचा मूलमंत्र काय होता?
A) विदेशात उद्योग वाढवा B) शासकीय साहाय्य घ्या
C) स्वदेशी उद्योगांची सुरुवात D) आयात वाढवा

02) दृष्टी असूनही अंध या वाक्याचा योग्य अर्थ कोणता?
A) अंधत्व दूर होणे B) डोळे असूनही दुर्लक्ष करणे C) दृष्टी नसणे D) ज्ञानाचे कौतुक करणे

03) जिथे इच्छा, तिथे मार्ग - या वाक्याचा अर्थ काय?
A) इच्छा नसल्यास मार्ग चुकतो B) प्रयत्नांमुळे मार्ग सापडतो
C) इच्छेचा अंत दुःखात होतो D) मार्ग मिळाल्यावर इच्छा संपते

04) द्रष्टे या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?
A) विचारशून्य B) दूरदृष्टी असलेला C) संधीसाधू D) अंध

05) आळशी या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता?
A) सुस्त B) धीट C) परिश्रमी D) संयमी

## उतारा - 103

शाळेची घंटा वाजली, की फक्त वेळच नाही तर एक भावनांचं विश्वही बदलतं. प्रमोद नवलकर यांचा जेव्हा घंटा वाजते हा लेख म्हणजे अशा अनेक लहानग्यांच्या भावविश्वाचा आरसा आहे. शाळेच्या प्रत्येक तासाची सुरुवात किंवा शेवट ही त्या घंटेशी जोडलेली असते. प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात घंटेचा आवाज वेगळा अर्थ घेऊन येतो - काहींसाठी ती सुटकेची असते, काहींसाठी सुरु होणाऱ्या परीक्षेची सूचना, तर काहींसाठी ती आनंदाच्या सुट्टीची घोषणा. लेखकाने

आपल्या लहानपणीच्या आठवणी सांगताना घंटेशी जोडलेले अनेक प्रसंग जिवंत केले आहेत. शिक्षक वर्गात येण्याआधीचा क्षण, तास संपण्याची वाट पाहणारी नजर, आणि मधल्या सुट्टीतील गोंगाट - हे सारे चित्रण इतकं नेमकं आहे की, वाचकही त्या आठवणीत रंगून जातो. घंटा ही फक्त यंत्र नव्हे, तर ती एक भावना आहे - एका साचेबद्ध वेळापत्रकात विद्यार्थ्यांचं जीवन कसं बांधलेलं असतं, हे ती दररोज सांगते.

01) घंटा वाजल्यावर विद्यार्थ्यांच्या मनात काय बदल होतो?
A) केवळ घड्याळ पाहतात B) भावनांचं वातावरण बदलतं
C) शिस्त मोडतात D) शिक्षक घाबरतात

02) लेखकाच्या मते घंटा म्हणजे काय?
A) एक ध्वनी यंत्र B) सुट्टीसाठी उपयोगी वस्तू C) केवळ लोखंडी वस्तू D) एक भावना

03) शाळेच्या कोणत्या क्षणांशी घंटा जोडलेली असते?
A) केवळ सकाळी B) एकाच विशिष्ट वेळी
C) प्रत्येक तासाच्या सुरुवात व शेवटी D) सणानंतर

04) घोंगाट या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?
A) नीरवता B) शांतता C) गोंधळ D) स्वर

05) घंटेचा आवाज काही विद्यार्थ्यांसाठी कशाचे चिन्ह असतो?
A) आजारपणाचे B) परीक्षेच्या सुरूवातीचे C) खेळ संपल्याचे D) शिक्षक बदलल्याचे

## उतारा - 104

वागदरा हे माझं लहानपणीचं माहेर. डोंगराच्या कुशीत वसलेलं ते गाव आजही माझ्या आठवणीत ताजं आहे. गरीब असलो, तरी माणुसकीने श्रीमंत होतो आम्ही. माझ्या आईच्या हातच्या भाकऱ्या, बापाचं दिवसभर कष्ट करून रात्री सांगितलेलं एखादं गोष्ट, आणि अंगणात खेळताना झाडावरून येणारा पाखरांचा किलबिलाट हेच माझं बालपण. शाळा दोन मैल दूर होती, पण पावसात चिखल तुडवत आम्ही ती चालत जात असू. पण शिक्षणासाठी तो त्रास गोड वाटायचा. गावात वीज नव्हती, पण मेणबत्तीतून ज्ञानाचं उजेड मिळवण्याची आमची जिद्द अढळ होती. जात, धर्म, श्रीमंती याचं भान नव्हतं आम्हाला सगळेच एकमेकांच्या दु:खात सहभागी व्हायचो. वागदऱ्याची माती ही फक्त काळी नव्हती, ती श्रमाची होती. तिथली झाडं सावली देणारी, माणसं प्रेम देणारी होती. माझ्या जीवनाचं खरं शिक्षण वागदऱ्यातच मिळालं. पुढे शहरात आलो, मोठ्या इमारती, निळे दिवे, गजबजलेले रस्ते पाहिले, पण मन मात्र नेहमी त्या गावरान पायवाटांमध्ये हरवलेलं असायचं. माझं माहेर वागदरा म्हणजे फक्त गाव नव्हे, ती माझी ओळख, माझं अस्तित्व होतं. ती आठवण म्हणजे मला मिळालेला खजिना होता जिथे प्रेम, कष्ट आणि आत्मसन्मान यांचा संगम होता.

01) लेखकाच्या मते वागदऱ्यातील माणसं कशी होती?
A) धनवान व अहंकारी B) कष्टाळू व माया करणारी
C) स्वार्थी व बेमालूम D) शिक्षणापासून दूर आणि बेपर्वा

02) वागदऱ्याची माती ही फक्त काळी नव्हती या वाक्यातील माती या शब्दाचा अर्थ काय सूचित करतो?
A) शेतीची जमीन B) गावाचा परिसर
C) श्रमांची किंमत D) काळजीपूर्वक राखलेला कोठार

03) लेखकाला शहरात जाऊनही काय आठवत राहिलं?

A) मोठी इमारती आणि गजबजाट B) वागदऱ्याच्या गावरान पायवाटा

C) नवीन लोकांचे स्वागत D) शहरातील झगमगाट

04) ज्ञानाचं उजेड या वाक्याचा अर्थ काय?

A) दिवा लावणे B) ग्रंथ वाचन

C) शिक्षणातून मिळणारा विकास D) वीजेची सोय

05) माणुसकीने श्रीमंत होतो या वाक्याचा विरुद्धार्थी पर्याय कोणता?

A) गरिबी आणि अहंकार B) धनाने श्रीमंत, पण माणुसकी गमावलेली

C) गरीब आणि अशिक्षित D) धार्मिक पण असंवेदनशील

## उतारा - 105

संगीत ही केवळ कला नसून ती एक साधना आहे असे मला बालपणापासून वाटत आले. माझ्या आई मोगुबाई कुर्डीकर यांनी मला केवळ राग-रागिणी शिकवल्या नाहीत, तर त्या मागचं तत्वज्ञानही शिकवलं. माझी जडणघडण ही केवळ सुरांच्या संगतीत नव्हती, तर ती अंतर्मनाच्या अनुशासनातून झाली. सुर हे केवळ ऐकण्यासाठी नसतात, ते जाणवण्यासाठी असतात. त्या जाणिवेसाठी संयम, श्रम, आणि एकाग्रता लागते. मी गाणं हे व्यासपीठावर गात नव्हते, मी ते माझ्या आत्म्यातून प्रकट करत होते. शास्त्रीय संगीत हे जितकं सखोल, तितकंच नाजूक त्यामुळे त्याचं सादरीकरण हे केवळ तंत्रावर नव्हे, तर भावनेवर अवलंबून असतं. लोकांनी अनेकदा विचारलं, तुम्ही नियम मोडता? मी म्हणते, मी नियमांमध्येच नवं निर्माण करत असते. हे संगीत म्हणजे सततचा शोध, स्वतःशीचा संघर्ष आणि आंतरिक शुद्धतेचा प्रवास आहे. माझं गाणं हे केवळ श्रवण नाही, तर अनुभूती आहे. आज मागे वळून पाहताना वाटतं, ही जडणघडण ही फक्त किशोरी आमोणकरची नव्हती, तर एका परंपरेची होती जी गुरू, शिष्य, आणि श्रवणकर्त्यांच्या माध्यमातून अजूनही जिवंत आहे.

01) लेखकाच्या मते गाणं म्हणजे काय?

A) राग-रागिणींचा संग्रह B) आत्म्याचा प्रकट आविष्कार

C) व्यासपीठावरील प्रयोग D) मनोरंजनाचं माध्यम

02) मी गाणं व्यासपीठावर नव्हे, तर आत्म्यातून गात होते - या वाक्याचा अर्थ काय दर्शवतो?

A) गाण्याचं स्वरूप धार्मिक होतं B) गायन हे तंत्राधारित नव्हतं

C) गायन म्हणजे अंतःकरणातून येणारी अनुभूती D) व्यासपीठावर गायन करणं चुकीचं आहे

03) लेखिकेच्या संगीताच्या जडणघडणीत काय महत्त्वाचं ठरलं?

A) बाह्य सौंदर्य B) स्पर्धात्मक वृत्ती

C) आईकडून मिळालेली शिस्त व तत्वज्ञान D) यश मिळवण्याची हाव

04) मी नियमांमध्येच नवं निर्माण करत असते. - या विचाराशी कोणता प्रचार जुळतो?

A) जुनं ते सोनं B) नवा मार्ग शोधणे C) अंधानुकरण करणे D) मूळावरून फांदी वळते

05) लेखिकेच्या मते शास्त्रीय संगीत सादर करताना काय आवश्यक असतं?

A) प्रेक्षकांची दाद B) सुंदर वेशभूषा

C) तंत्र आणि भावना यांचा समतोल D) प्रसिद्धीची इच्छा

## उतारा - 123

संस्कृत साहित्यातील तेजस्वी तारा म्हणजे महाकवी कालिदास. त्यांच्या जीवनाबाबत अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत, पण ठोस ऐतिहासिक माहिती फारशी उपलब्ध नाही. तरीही त्यांचा कालखंड इसवी सनाच्या चौथ्या-पाचव्या शतकाच्या दरम्यान मानला जातो. ते उज्जैन नगरीत वास्तव्य करत असल्याचे संकेत त्यांच्या अनेक काव्यांतून मिळतात. कालिदास हे मूळचे अत्यंत अज्ञानी होते, असं सांगितलं जातं. एका राजकन्येच्या बुद्धिमत्तेवरून झालेल्या उपहासामुळे त्यांनी ज्ञानार्जनाचा संकल्प केला. त्यांनी महाकालेश्वराच्या चरणी तपश्चर्या केली आणि त्यांच्या कृपेने विद्वत्ता प्राप्त केली, असे मानले जाते. त्यामुळे त्यांना 'महाकालाचा कवि' म्हणूनही संबोधले जाते. त्यांची 'अभिज्ञान शाकुंतल', 'मेघदूत', 'रघुवंश', 'कुमारसंभव' ही काव्ये भारतीय साहित्याचा शिरोमणी ठरली आहेत. कालिदासांची भाषा रससिद्ध, अलंकारयुक्त आणि गूढ अर्थांनी नटलेली आहे. त्यांची काव्यशैली ही संस्कृत साहित्यातील एक उच्च शिखर मानली जाते. त्यांच्या कवित्वामधून निसर्ग, प्रेम, धर्म आणि राजधर्माचे दर्शन घडते. कालिदास हे एकाच वेळी कवी, नाटककार आणि तत्वचिंतक होते. त्यांच्या लेखणीचा गंध आजही भारतीय साहित्यावर दरवळतो.

01) कालिदास यांना 'महाकालाचा कवि' का म्हणतात?
A) ते शंकराचार्यांचे शिष्य होते
B) त्यांनी महाकालाच्या कृपेने विद्वत्ता प्राप्त केली
C) ते उज्जैनचे राजा होते
D) ते इतिहासकार होते

02) कालिदास यांची कोणती काव्यकृती नाही?
A) रघुवंश B) मेघदूत C) शाकुंतल D) गीतगोविंद

03) 'शिरोमणी' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?
A) मुकुट B) सर्वोत्तम C) कडवट D) माध्यम

04) 'त्यांच्या लेखणीचा गंध आजही दरवळतो' या वाक्यातील 'गंध दरवळतो' ही कोणती म्हण दर्शवते?
A) तोंडावरचा मुखवटा गळणे
B) चारचौघात नावलौकिक मिळणे
C) हसण्यावारी नेणे
D) पाणी पिऊन शिव्याशाप देणे

05) कालिदास यांच्या साहित्याचे मुख्य वैशिष्ट्य कोणते?
A) ऐतिहासिक सत्य
B) दैनंदिन व्यवहार
C) अलंकारयुक्त रससिद्ध भाषा
D) धार्मिक पोथी लेखन

## उतारा - 124

कर्नाटकमधील विजयनगर साम्राज्याची राजधानी असलेले हम्पी हे शहर आजही इतिहासाच्या पावलांचा साक्षीदार म्हणून उभे आहे. तुंगभद्रा नदीच्या काठावर वसलेले हे शहर एकेकाळी समृद्धी, विद्या आणि कला यांचे केंद्र होते. इ.स. 1336 मध्ये हरिहर आणि बुक्क राय यांनी स्थापलेले विजयनगर साम्राज्य हे दक्षिण भारतातील सर्वात बलाढ्य साम्राज्यांपैकी एक होते. त्याची राजधानी हम्पी ही स्थापत्यकलेचा एक अनोखा नमुना आहे. आजच्या काळातही हम्पीचे विठ्ठल मंदिर, विरुपाक्ष मंदिर, हत्तीशाळा, पत्थराचे रथ आणि बाजारपेठांचे अवशेष पर्यटकांना भुरळ घालतात. या वास्तूंमध्ये दगडात कोरलेल्या सुंदर शिल्पकृती आजही त्याकाळच्या कलेच्या प्रावीण्याची साक्ष देतात. UNESCO ने हम्पीला जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले आहे. संपूर्ण परिसरात पसरलेले गडकोट, राजवाड्यांचे अवशेष आणि भव्य बागा हे हम्पीचे वैभव सांगतात. इतिहासात रुजलेले हे शहर म्हणजे भारताच्या सांस्कृतिक वैभवाचे आरसे आहे. 'जळालेले शहरही कधी प्रकाशमान होते', हे वाक्य हम्पीच्या बाबतीत अगदी योग्य ठरते.

01) हम्पी कोणत्या साम्राज्याची राजधानी होती?

A) मौर्य साम्राज्य B) चोल साम्राज्य C) विजयनगर साम्राज्य D) सातवाहन साम्राज्य

02) तुंगभद्रा नदीच्या काठावर वसलेले शहर कोणते आहे?

A) अजंठा B) हम्पी C) अजमेर D) पाटलिपुत्र

03) 'शिल्पकृती' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?

A) चित्र B) मूर्ती C) लेखन D) नृत्य

04) UNESCO ने हम्पीला कोणत्या यादीत समाविष्ट केले आहे?

A) ऐतिहासिक स्थळ B) जागतिक वारसा स्थळ C) पर्यटन केंद्र D) प्राचीन बाजारपेठ

05) विठ्ठल मंदिर प्रसिद्ध आहे -

A) धातूशिल्पासाठी B) गडकोटासाठी C) पत्थराच्या रथासाठी D) जलप्रणालीसाठी

## उतारा - 125

रोमन साम्राज्य हे प्राचीन जगातील एक अत्यंत प्रभावशाली आणि दीर्घकाळ टिकणारे साम्राज्य होते. इ.स.पूर्व 27 मध्ये ऑगस्टस सीझरने याची स्थापना केली. हे साम्राज्य भूमध्य समुद्राच्या सभोवतालच्या अनेक प्रदेशांवर राज्य करत होते. रोमन प्रशासन, कायदे, रस्तेव्यवस्था, आणि स्थापत्यकलेमध्ये उल्लेखनीय प्रगती झाली होती. त्यांनी कोलोसियम, जलवाहिन्या, आणि मोठ्या सार्वजनिक इमारती उभारल्या. राजकीयदृष्ट्या, रोममध्ये सम्राटाला अत्यंत अधिकार होते. सेन्ट हे सल्लागार मंडळ असून, सुरुवातीला लोकप्रतिनिधी संस्थेचे स्वरूप होते. लष्करशक्ती आणि शिस्त यामुळे रोमचे साम्राज्य खूप दूरपर्यंत पसरले. रोमने ब्रिटनपासून आफ्रिकेपर्यंत, आणि स्पेनपासून आशियापर्यंत आपला प्रभाव प्रस्थापित केला होता. परंतु अंतर्गत भ्रष्टाचार, वारंवार सम्राट बदल, आर्थिक बिघाड आणि बाह्य आक्रमणामुळे रोमन साम्राज्य हळूहळू दुर्बल झाले. अखेर इ.स. 476 मध्ये पश्चिम रोमन साम्राज्याचा अंत झाला. मात्र, रोमन संस्कृती, कायदे आणि भाषा यांचा प्रभाव युरोपभर कायम राहिला.

01) रोमन साम्राज्याची स्थापना कोणत्या वर्षी झाली?

A) इ.स. 476 B) इ.स.पूर्व 27 C) इ.स. 100 D) इ.स.पूर्व 753

02) 'रस्ते रोमन साम्राज्याचे खरे शस्त्र होते' - या विधानाचा अर्थ काय?

A) रस्ते सजावटीसाठी होते

B) लष्कराने शस्त्र ठेवण्यासाठी होते

C) रस्त्यांमुळे व्यापारी आणि लष्करी हालचाल शक्य झाली

D) लोक फक्त प्रवासासाठी वापरत

03) सर्वांच्या मालकीचे याचा अर्थ -

A) सम्राटाचे B) सार्वजनिक C) साम्राज्य D) सभोवतालचे

04) रोमच्या पतनास कारणीभूत ठरलेला एक प्रमुख घटक कोणता?

A) मजबूत लष्कर B) चांगली रस्तेव्यवस्था

C) आर्थिक बिघाड D) सांस्कृतिक वारसा

05) रोमन साम्राज्याचा पाडाव कधी झाला?

A) इ.स. 27 B) इ.स. 1453 C) इ.स. 476 D) इ.स.पूर्व 100

## उतारा - 126

संत नामदेव हे 13 व्या शतकातील प्रसिद्ध मराठी संतकवी होते. त्यांचा जन्म इ.स. 1270 च्या सुमारास पंढरपूरजवळच्या नरसी बामणी या गावी झाला. ते वीस वर्षांपर्यंत विठोबा भक्तीत तल्लीन होते. बालपणापासूनच त्यांना भक्तीची ओढ होती. त्यांचे वडील दामाशेट शिंपी होते आणि विठोबा पूजेसाठी नामदेव वडिलांबरोबर मंदिरात जात. नामदेवांच्या जीवनात संत ज्ञानेश्वरांचे महत्त्वाचे स्थान होते. त्यांच्यासोबत त्यांनी महाराष्ट्रभर कीर्तन करून लोकांमध्ये भक्तीचा प्रसार केला. त्यांनी पंजाबपर्यंत प्रवास करून भजन-कीर्तन केले, व त्यामुळे त्यांच्या अभंगांचा प्रभाव गुरू ग्रंथ साहिबमध्येही दिसतो. नामदेवांचे अभंग हे भक्तिरसाने ओतप्रोत असून, त्यांनी आपल्या काव्यातून भक्ती, मानवता आणि विठोबा भक्तीचे महत्त्व मांडले. त्यांचे लेखन सहज, सोपे परंतु खोल अर्थ असलेले आहे. 'माझे माहेर पंढरी.....' हे त्यांचे विख्यात अभंग आहे. संत नामदेवांचे संपूर्ण आयुष्य भक्तिमार्गासाठी समर्पित होते. इ.स. 1350 च्या सुमारास त्यांनी देहत्याग केला. त्यांचे कार्य आजही महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचा अनमोल भाग आहे.

01) संत नामदेव यांचा जन्म कोणत्या गावात झाला?
A) पंढरपूर B) नरसी बामणी C) आळंदी D) देहू

02) संत नामदेवांचे वडील कोणत्या व्यवसायात होते?
A) शेतकरी B) कीर्तनकार C) शिंपी D) पुरोहित

03) 'भक्तीला वय नसते' - या म्हणीचा संबंध संत नामदेवांच्या जीवनाशी कसा लावता येईल?
A) त्यांनी वृद्धावस्थेतच भजन सुरू केले B) बालपणातच भक्तीत तल्लीन झाले
C) त्यांनी भक्ती नाकारली D) त्यांनी भक्तीचा त्याग केला

04) संत नामदेवांनी त्यांच्या कीर्तनांनी कोणत्या भागात भक्तीचा प्रचार केला?
A) केवळ महाराष्ट्रात B) फक्त पंढरपूरात C) पंजाबपर्यंत D) दक्षिण भारतात

05) संत नामदेवांच्या अभंगांचा प्रभाव खालीलपैकी कुठे दिसतो?
A) रामायणात B) श्रीगुरु ग्रंथ साहिबमध्ये
C) भगवद्गीतेत D) तुकाराम गाथेत

## उतारा - 127

मगध हे भारतातील एक अत्यंत प्राचीन आणि सामर्थ्यशाली राज्य होते. गंगा नदीच्या दक्षिणेपासून सुरू होणारे हे राज्य आजच्या बिहार आणि झारखंडच्या भागात विस्तृत होते. प्रारंभी बिंबिसार या हर्यक वंशीय राजाने याची घडी बसवली. त्यानंतर त्याचा पुत्र अजातशत्रूने मगधचा विस्तार केला आणि अनेक छोट्या राज्यांना जिंकले. बिंबिसार आणि अजातशत्रू यांनी राजगृह या राजधानीचा विकास केला. नंतर नंद वंश, विशेषतः महापद्मनंद, याने मगधचे सामर्थ्य आणखी वाढवले. परंतु त्यानंतर मौर्य वंश उदयास आला. चाणक्याच्या मार्गदर्शनाखाली चंद्रगुप्त मौर्याने नंद राजाला पराभूत करून मौर्य साम्राज्याची स्थापना केली. अशोक मौर्य हा याच वंशातील एक महान सम्राट मानला जातो. कलिंग युद्धानंतर त्याने बौद्ध धर्म स्वीकारून अहिंसेचा प्रचार केला. मगध साम्राज्य हे प्राचीन भारताच्या राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात फारच प्रभावी ठरले. त्याच कालखंडात बौद्ध व जैन धर्माचा प्रसार झाला. शिक्षणासाठी नालंदा व तक्षशिला यासारख्या विद्यापीठांची उभारणी झाली. मगध साम्राज्याचा इतिहास केवळ युद्धांचा नाही तर सांस्कृतिक वैभवाचाही आहे. या साम्राज्यामुळे भारताचे एकत्रीकरण शक्य झाले आणि इतिहासात त्याचे स्थान अजरामर राहिले.

मयूर पब्लिकेशन,उदगीर

आनंदी पब्लिकेशन,उदगीर

समीक्षा प्रकाशन,उदगीर

**Order Now**

**9595704470**



